

देवी कात्यायनी
ही हिंदू धर्मातील देवी दुर्गा किंवा पार्वतीचे सहावे स्वरूप मानले जाते.

॥ श्री ॥

आपली भूमी... आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

अहिल्यानगर | शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक १०१ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145


## SPOT NEWS

### एसटीच्या १५ टक्के हंगामी भाडेवाढीचा प्रस्ताव नामंजूर!

**मुंबई** – दुष्काळाच्या झळांनी होरपळणारा शेतकरी, महागाईमुळे आर्थिक ओढाताण सहन करणारा सर्वसामान्य नागरिक आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करताना होणारी दमछाक, अशा परिस्थितीत जनतेवर भाडेवाढीचा अतिरिक्त भार कशासाठी, असा सवाल उपस्थित करत परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिवाळीच्या गर्दीच्या हंगामासाठी प्रस्तावित केलेली १५ टक्के हंगामी भाडेवाढ नामंजूर केली. दरवर्षी दिवाळीच्या गर्दीच्या काळात एसटीच्या प्रवासी भाड्यात हंगामी वाढ केली जाते. यंदाही १ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत प्रवासी भाड्यात सरसकट १५ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव एसटी प्रशासनाने मंत्री सरनाईक यांच्याकडे सादर केला होता. मात्र, आधीच आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या जनतेवर आणखी भार टाकणे योग्य नसल्याची भूमिका घेत त्यांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला. 'आधीच संकटांनी घेरलेल्या जनतेला भाडेवाढीचा चटका देऊन त्यांच्या जखमेवर मीठ चोळणे मला मान्य नाही,' असे स्पष्ट करीत त्यांनी जनहिताला प्राधान्य दिले.

### इस्लाम स्वीकारणाऱ्या हिंदूस आरक्षणाचा लाभ नाही

**नवी दिल्ली** – हिंदू धर्मातून इस्लाममध्ये धर्मांतर केलेल्या व्यक्तींना केवळ त्यांच्या पूर्वीच्या जातीच्या सामाजिक मागासलेपणाच्या आधारावर मागासवर्गीय मुस्लिम आरक्षणाचे लाभ देता येणार नाहीत, असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने तामिळनाडू सरकारला मोठा धक्का दिला आहे. अशा व्यक्तींना मागासवर्गीय मुस्लिम प्रवर्गातून आरक्षणाचे लाभ देण्यासंदर्भातील राज्य सरकारचा आदेश रद्द करण्याचा मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवला. तसेच, उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणारी तामिळनाडू सरकारची याचिका फेटाळून लावली. न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. हिंदू सामाजिक व्यवस्थेतून बिगरहिंदू सामाजिक व्यवस्थेत धर्मांतर करणाऱ्या व्यक्तीला धर्मांतरापूर्वीच्या सामाजिक मागासलेपणाच्या आधारावरच भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १६(४) अंतर्गत आरक्षणाचा लाभ मागता येणार नाही असे न्यायालयाने स्पष्ट केले.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तुटपुंजी मदत, शेतकरी संतप्त

**महागाईच्या काळात तुटपुंजी मदत देऊन बोळवण करण्याचा शासनाचा प्रयत्न । विरोधी पक्ष आक्रमक**

**मुंबई । वीरभूमी** –

राज्यात भीषण दुष्काळ पडला असून, मराठवाडा, विदर्भातील स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. शेतकऱ्यांचा खरीप हंगाम तर वाया गेला. त्यानंतर रबी हंगामदेखील हातातून गेला आहे. या अभूतपूर्व संकटात राज्य सरकारने भरघोस मदत जाहीर करणे आवश्यक होते. परंतु आधी नियमावलीचे कारण सांगून दिवाळीआधी शेतकऱ्यांना मोठी मदत देण्याचे आश्वासन दिले. मात्र, आता पंचनाम्याचे कारण पुढे करून केंद्राच्या मदतीला विलंब होणार असल्याचे सांगत दिवाळीआधी शेतकऱ्यांच्या खात्यात ५ हजारांवर बोळवण करण्याचा निर्णय घेतला. भीषण दुष्काळ आणि महागाईचा उच्चांक पाहिला तर ही अत्यंत तुटपुंजी रक्कम असून ही शेतकऱ्यांची थट्टा आणि फसवणूक आहे. शेतकरी काय भिकारी आहे का, अशा संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. शेतकरीदेखील तीव्र संताप व्यक्त करीत आहेत.

राज्य सरकारने पीक पंचनाम्याचे आदेश देताना दिवाळीआधी शेतकऱ्यांना मोठी मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे संकटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मोठ्या मदतीची अपेक्षा होती. परंतु आधी ५ ऑक्टोबरच्या डेडलाईनची नियमावली सांगितली. परंतु शेत शिवारात सध्या सर्वत्र धुरळा असताना सरकारने पंचनाम्याचे कारण दिले आणि आता पंचनाम्याला विलंब लागतोय,



त्यामुळे दिवाळीआधी मोठी मदत देता येणार नाही, म्हणून अग्रिम रकमेच्या नावाखाली शेतकऱ्यांची दिवाळीआधी केवळ ५ हजारांत बोळवण करण्याचा काल निर्णय जाहीर केला.

त्यामुळे विरोधी पक्षनेत्यांसह शेतकरी नेते, शेतक-यांनी तीव्र संताप व्यक्त केला. सरकारच्या या घोषणेचा निषेधही केला. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये सरकारबद्दल संतापाची भावना निर्माण झाली असून, राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला, अशा शब्दांत फडणवीस सरकारवर टीकास्त्र होत आहे.

राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने ६ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. या पॅकेजनुसार दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना ५ हजार रुपयांची अग्रिम मदत देण्याची घोषणा केली. या निर्णयावर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी ५ हजार रुपयांची मदत म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे असल्याचे म्हटले. ही मदत तुटपुंजी असून शेतकऱ्यांच्या भावनेशी खेळ असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे.

दिवाळीपूर्वी ५ हजार रुपयांची मदत देऊन शेतकऱ्यांची दिशाभूल केली जात आहे. आंदोलन आणि मोर्चांपासून शेतकऱ्यांचे लक्ष विचलित करण्यासाठी सरकार हा डाव खेळत आहे. दुष्काळामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, त्यांना तुटपुंजी मदत नव्हे तर हेक्टरी १ लाख रुपयांचे अनुदान मिळणे आवश्यक आहे. सरकारचे धोरण शेतकरी हिताचे नाही, सरकारच्या ५ हजारांसाठी शेतकऱ्यांना बँकेच्या दारात उभे राहावे लागणार आहे. ही शेतकऱ्यांची थट्टा आहे, अशा शब्दांत मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी टीकास्त्र सोडले.

## अहिल्यानगर ग्रामीण उपविभागातील तीन गुन्हेगार हद्दपार

**पारनेर । वीरभूमी** –

अहिल्यानगर ग्रामीण पोलीस उपविभागातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या इसमांविरुद्ध पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ५६ (१) (अ) व (ब) अन्वये आणखी तीन जणांना अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश संबंधित उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी दिले आहेत. यामध्ये दोघांना दोन वर्षांसाठी, तर एकाला एक वर्षासाठी हद्दपार करण्यात आले आहे.

हद्दपार करण्यात आलेल्यांमध्ये आदिनाथ मच्छिंद्र पठारे (वय ३०, रा. पठारवाडी, ता. पारनेर), विजय बाळासाहेब रोहोकले (वय २५, रा. भाळवणी, ता. पारनेर) आणि किरण बबन कोळपे (रा. विळद, ता. जि. अहिल्यानगर) यांचा समावेश आहे.

आदिनाथ पठारे याच्याविरुद्ध पारनेर पोलीस ठाण्यात पाच, पुणे जिल्ह्यातील चंदगाव पोलीस ठाण्यात चार आणि शिरूर पोलीस ठाण्यात एक, असे एकूण दहा गुन्हे दाखल असल्याचे नमूद करण्यात आले आहे. विजय रोहोकले याच्याविरुद्ध पारनेर पोलीस ठाण्यात पाच दखलपात्र आणि दोन अदखलपात्र, असे एकूण सात गुन्हे दाखल आहेत. किरण कोळपे याच्याविरुद्ध एमआयडीसी, राहुरी, कोतवाली आणि तोफखाना पोलीस ठाण्यांत मिळून पाच गुन्हे दाखल आहेत.

पारनेर आणि एमआयडीसी पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी संबंधित इसमांविरुद्ध हद्दपारीचे प्रस्ताव सादर केले होते. उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांनी या प्रस्तावांची चौकशी करून अहवाल संबंधित उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडे पाठविला. त्यानंतर आदिनाथ पठारे आणि विजय रोहोकले यांना दोन वर्षांसाठी, तर किरण कोळपे याला एक वर्षासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश देण्यात आले.

## अकोले तालुक्यात मित्राची गोळ्या झाडून हत्या; दोघांना अटक

**पेढेवाडी शिवारातील जंगलात घडली घटना । दोन्ही आरोपींना पोलीस कोठडी**

**अकोले । वीरभूमी** –

अकोले तालुक्यातील पेढेवाडी शिवारात मित्रांमधील वादातून एका तरुणाची गोळ्या झाडून हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. भोरू सोमा कातोरे (वय ३२, रा. दगडवाडी, ता. अकोले) असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी धोंडू सोमा पथवे (रा. दगडवाडी) आणि नवनाथ नारायण कुळाळ (रा. पेढेवाडी) या दोघांना अकोले पोलिसांनी अटक केली आहे. दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. ही घटना १२ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारच्या सुमारास घडली.

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, मयत भोरू कातोरे आणि आरोपी धोंडू पथवे व नवनाथ कुळाळ हे तिघे मित्र होते. भोरू याचे आरोपींच्या जवळच्या नात्यातील एका मुलीसोबत प्रेमसंबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप आहे. कुटुंबाच्या संपर्कात येणे, घरात येणे-जाणे किंवा विविध कारणांनी जवळीक साधण्याचा प्रयत्न करणे, अशा त्याच्या हालचालींबाबत आरोपींना माहिती मिळाली होती.

या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर आरोपींनी भोरूला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, आपण कोणाशीही प्रेमसंबंध ठेवलेले नाहीत किंवा कोणाशीही गद्दारी केली नसल्याचे त्याने सांगितल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. मित्र म्हणून त्याला समज देऊनही त्याच्या वागण्यात बदल झाला नसल्याचा आरोप आहे.

गावात या प्रकरणाची चर्चा सुरू झाल्यानंतर आरोपींनी भोरूला संपविण्याचा कट रचल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. त्यानुसार, दोघांनी भोरूला एका ठिकाणी येण्यास सांगितले. तिघे काही काळ एकत्र होते. त्यानंतर भोरूला पेढेवाडी शिवारातील जंगल परिसरात नेण्यात आले.

तेथे भोरूला मारहाण करून गावठी पद्धतीच्या बंदुकीने गोळीबार करण्यात आला, अशी माहिती तपासातून समोर आली आहे. या घटनेत त्याचा मृत्यू झाला. घटनेनंतर मृतदेह जंगल परिसरात नेऊन त्यावर पाला-पाचोळा टाकण्यात आल्याचा पोलिसांचा प्राथमिक तपास आहे. भोरूची गाडी मात्र घटनास्थळीच बेवारस स्थितीत राहिली. त्यानंतर दोन्ही आरोपी तेथून निघून गेल्याचे तपासात समोर आले.

दरम्यान, भोरू दोन दिवस घरी न परतल्याने त्याचा भाऊ मनाजी सोमा कातोरे यांनी अकोले पोलिसांना याबाबत माहिती दिली. पोलिसांनी बेपत्ता असल्याची नोंद करून तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांच्या हाती काही संशयास्पद बाबी लागल्या. प्रथम भोरूची गाडी पोलिसांना आढळून आली. तसेच तो बेपत्ता झालेल्या दिवशी काही व्यक्तींनी भोरूला आरोपी धोंडू पथवे आणि नवनाथ कुळाळ यांच्यासोबत पाहिल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी दोन्ही आरोपींचा शोध घेतला. मात्र, ते त्यांच्या घरी आढळून आले नाहीत. त्यामुळे पोलिसांचा संशय अधिक बळावला. दरम्यान, भोरूच्या शवविच्छेदन अहवालातून त्याचा मृत्यू गोळीबारामुळे झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला.

त्यानंतर धोंडू पथवे आणि नवनाथ कुळाळ या दोघांना अटक करण्यात आली असून, त्यांची कसून चौकशी सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संदीप कोळी करीत आहेत.

# मोहटादेवी गडावर पाचव्या माळेला भाविकांची मोठी गर्दी

**आकर्षक विद्युत रोषणाईने उजळला मंदिर परिसर । धार्मिक श्रद्धेसोबत निसर्गरम्य वातावरणाचा भाविक घेताहेत आनंद**

**पाथर्डी । वीरभूमी** –

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त श्रीक्षेत्र मोहटादेवी गडावर आई जगदंबेच्या दर्शनासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविकांची मोठी गर्दी होत आहे. प्रत्येक माळेला भाविकांची संख्या वाढत असून, पाचव्या माळेनिमित्त सकाळपासूनच हजारो भाविक पायी तसेच उपलब्ध वाहनांनी गडावर दाखल झाले. त्यामुळे गडाकडे जाणारे सर्व रस्ते भाविकांच्या गर्दीने फुलून गेले आहेत.

राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेल्या माहूरगड येथील श्री रेणुकामातेचे अंशात्मक रूप असलेले मोहटादेवी शक्तिपीठ लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. माहूरगडच्या रेणुकामातेवर श्रद्धा असलेले भाविक मोहटादेवी गडावर येऊन आई जगदंबेचा आशीर्वाद घेतात. शेकडो वर्षांपासून आणि पिढ्यानपिढ्या चालत आलेली ही भक्तीची परंपरा आजही कायम आहे.





**आकर्षक रोषणाईने उजळला गड**

यावर्षी राज्यावर दुष्काळाचे सावट असले तरी आई जगदंबेच्या कृपेने या संकटातून मार्ग निघून सर्वत्र सुख-समृद्धी नांदेल, असा विश्वास भाविकांच्या मनात आहे. नवरात्रोत्सवानिमित्त मंदिराच्या गाभाऱ्यात विविध रंगीबेरंगी फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली आहे. तसेच मंदिरावर करण्यात आलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईमुळे गडाच्या सौंदर्यात भर पडली असून, ही सजावट भाविकांचे विशेष आकर्षण ठरत आहे.

दुष्काळी परिस्थिती असतानाही देवस्थान व्यवस्थापनाने पाण्याचे सूक्ष्म नियोजन करून गड परिसरातील तसेच डोंगरमाथ्यावरील झाडे व निसर्ग हिरवागार ठेवला आहे. त्यामुळे गडावरील वातावरण अल्हाददायक झाले असून, धार्मिक दर्शनासोबतच निसर्गरम्य वातावरणाचाही आनंद भाविक घेत आहेत.

**धार्मिक उपक्रमांनी गडावर भक्तिमय वातावरण**

गडावर दररोज विविध धार्मिक उपक्रम, हरिनाम सप्ताह, भजन, सप्तशती पाठ तसेच अन्य धार्मिक विधी सुरू आहेत. या भक्तिमय वातावरणामुळे भाविकांना प्रसन्नतेचा अनुभव येत आहे. गडावर दैनंदिन पौराहित्य करणारे वेदशास्त्रसंपन्न भूषण देवा साकरे, भास्कर देवा, बाळासाहेब देशपांडे आदी ब्रह्मवृंद भाविकांना नवरात्र महात्म्य, देवीचे महात्म्य तसेच विविध धार्मिक कार्यांचे महत्त्व सांगत आहेत. त्यामुळे भाविकांची देवीवरील श्रद्धा, भक्ती व विश्वास अधिक दृढ होण्यासोबतच सकारात्मक भाव आणि आत्मविश्वास वाढत असल्याचे चित्र आहे.

**दुष्काळ निवारणासाठी देवीच्या चरणी साकडे**

दररोज राज्याच्या कानाकोपऱ्यातील तसेच तालुक्यातील रहिवासी, प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी आणि तालुक्यात व जिल्ह्यात सेवा बजावलेले देवीवरील श्रद्धा असलेले अनेक वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी सहकुटुंब दर्शनासाठी गडावर येत आहेत.

आई मोहटामातेच्या चरणी साकडे घालताना वरुणराजाने भरभरून कृपा करून दुष्काळाचे संकट दूर करावे, धरणीमाता हिरवीगार व्हावी, धनधान्याची समृद्धी नांदावी, बळीराजा सुखी व्हावा तसेच संपूर्ण देश सुख, शांती आणि समृद्धीने संपन्न व्हावा, अशी प्रार्थना भाविकांकडून केली जात आहे.

# SPOT NEWS

## कोतूळचे डॉ. सुभाष सोमण यांना राज्यस्तरीय ‘आरोग्यदूत’ पुरस्कार जाहीर

**● अकोले । वीरभूमी–**



ग्रामीण आणि दुर्गम आदिवासी भागात गेल्या ५८ वर्षांपासून अविरत वैद्यकीय सेवा देणारे कोतूळ येथील ज्येष्ठ वैद्यकीय व्यावसायिक डॉ. सुभाष केशव सोमण यांना स्वराज्य सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय ‘आरोग्यदूत’ सन्मान पुरस्कार जाहीर झाला आहे. वयाच्या ८२ व्या वर्षीही रुग्णसेवेचे व्रत सुरू ठेवणाऱ्या डॉ. सोमण यांच्या कार्याचा या पुरस्काराच्या माध्यमातून गौरव करण्यात येणार आहे. अहिल्यानगर येथे गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित राज्यस्तरीय सन्मान सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून आपल्या कर्तृत्वातून आदर्श निर्माण करणाऱ्या व्यक्तींना स्वराज्य सरपंच सेवा संघाच्या वतीने दरवर्षी राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. डॉ. सोमण यांनी वैद्यकीय क्षेत्रातील उच्च शिक्षणानंतर ग्रामीण तसेच दुर्गम आदिवासी भागातील नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी आपले आयुष्य समर्पित केले. अनेक वर्षांपासून सुरू असलेली त्यांची रुग्णसेवा ही परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण ठरली आहे. वयाच्या ८२ व्या वर्षीही सेवाभाव जपत वैद्यकीय सेवा देत असल्याने त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. या पुरस्कार निवड समितीने त्यांच्या दीर्घकालीन वैद्यकीय सेवेची आणि समाजहितासाठी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड केली आहे.

## अल्पवयीन विद्यार्थिनीचा पाठलाग करून त्रास; संबंधित तरुणाविरुद्ध कारवाईची मागणी

**● पाथर्डी । वीरभूमी–**

तालुक्यातील उत्तर भागातील एका गावातील इयत्ता बारावीत शिक्षण घेणाऱ्या १७ वर्षीय विद्यार्थिनीचा पाठलाग करून तिला त्रास दिल्याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. संबंधित तरुणाने दोन वेळा पाठलाग करून विद्यार्थिनीला अडविल्याचा आणि तिच्याशी अनुचित वर्तन केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. विद्यार्थिनीने दिलेल्या तक्रारीनुसार, ती मिरी येथे इयत्ता बारावीत शिक्षण घेत आहे. संबंधित तरुण हा त्यांच्याच गावातील रहिवासी असून, तो वारंवार पाठलाग करत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. दि. ६ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास विद्यार्थिनी सायकलवरून शाळेत गेली होती. सकाळी साडेअकराच्या सुमारास शाळा सुटल्यानंतर ती घरी जात असताना शाळेपासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर संबंधित तरुणाने मोटारसायकलवरून पाठलाग करून तिला थांबविल्याचा आरोप आहे. त्यानंतर त्याने जवळ येऊन तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यानंतर दि. १० ऑक्टोबर रोजी शाळा सुटल्यानंतर घरी जात असताना पुन्हा मोटारसायकलवरून पाठलाग केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावेळी वाहनाचा वेग कमी करून विद्यार्थिनीला सोबत येण्यास सांगितल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकारामुळे घाबरलेल्या विद्यार्थिनीने घरी जाऊन वडिलांना घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर वडिलांसोबत पाथर्डी पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल करण्यात आली. अल्पवयीन विद्यार्थिनीच्या तक्रारीची दखल घेऊन पोलिसांनी प्रकरणाची चौकशी करून संबंधिताविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी पालकांनी केली आहे. पुढील तपास पाथर्डी पोलीस करीत असून, या प्रकरणातील पुढील कारवाईबाबत अधिकृत माहिती उपलब्ध झालेली नाही.

# योजनेतून वगळलेल्या लाडकी बहीणींना तातडीने मानधन सुरू करा!

### हजारो महिलांचा अकोलेत भव्य मोर्चा । मानधन २,१०० रुपये करण्यासह ई-केवायसी पुन्हा सुरू करण्याची मागणी

**● अकोले । वीरभूमी–**



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात आलेल्या तसेच मानधन बंद झालेल्या महिलांचे मानधन तातडीने सुरू करावे, ई-केवायसी प्रक्रिया पुन्हा सुरू करावी आणि मासिक मानधन १,५०० रुपयांवरून २,१०० रुपये करावे, या प्रमुख मागण्यांसाठी अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या वतीने अकोले येथे हजारो महिलांचा भव्य मोर्चा काढण्यात आला. या वेळी महिलांनी मानधन अचानक बंद झाल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

अकोले तालुक्यातील रासने संकुल येथून मोर्चाला सुरुवात झाली. शहरातून काढण्यात आलेल्या या मोर्चाचे नेतृत्व जनवादी महिला संघटनेच्या राज्य सचिव प्राची हतीवलेकर आणि सहसचिव प्रीती शेखर यांनी केले.

भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) चे राज्य सचिव डॉ. अजित नवले, सदाशिव साबळे, नामदेव भांगरे, एकनाथ मेंगाळ आणि गणेश ताजणे यांनी मोर्चाला पाठिंबा दिला. मोर्चाच्या आयोजनासाठी सुमन विरणक, अनिता साबळे, संगीता साळवे, आराधना बोऱ्हाडे, निर्मला मांगे आणि हेमलता शेळके यांनी परिश्रम घेतले.

मोर्चानंतर तहसीलदार सिद्धार्थ मोरे आणि महिला व बालविकास अधिकारी केडर नागरे यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. मानधन पुन्हा सुरू करण्यासाठी अनेक महिलांनी अर्ज दाखल केले. उर्वरित महिलांचे अर्ज २२ ऑक्टोबर रोजी दाखल करण्यात येणार असल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले.

महिला घरकाम, शेती, पशुपालन आणि कुटुंबातील सदस्यांची काळजी घेण्यासारखी अनेक कामे वर्षभर बिनमोबदल्याने करतात. भारतीय स्टेट बँकेच्या संशोधन विभागाच्या गणनेनुसार, महिलांच्या बिनमोबदल्याच्या घरगुती व काळजीवाहू कामाचे वार्षिक मूल्य सुमारे २२.७ लाख कोटी रुपये असल्याचा दावा संघटनेने मांडला.

लाडकी बहीण योजनेतील मानधन ही सरकारची दया नसून महिलांच्या श्रमाच्या मूल्याची अंशतः परतफेड आहे, अशी भूमिका संघटनेने घेतली. महिलांचे आर्थिक योगदान लक्षात घेऊन योजनेतील मानधन बंद न करता पात्र महिलांना त्याचा लाभ मिळावा, अशी मागणीही करण्यात आली.

निराधार सहाय्य योजनांचा लाभ घेणाऱ्या महिला, विधवा, वृद्ध महिला तसेच विविध शासकीय योजनांमध्ये तुटपुंज्या मानधनावर काम करणाऱ्या महिलांना लाडकी बहीण योजनेतून वगळू नये, अशी मागणी संघटनेने केली आहे.

याशिवाय, वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या पात्र श्रमिक महिलांचा योजनेत समावेश करावा, ६५ वर्षांवरील महिलांनाही योजनेचा लाभ द्यावा, जाचक अटी रद्द कराव्यात, बंद झालेले मानधन पुन्हा सुरू करावे आणि थकीत रक्कमही अदा करावी, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या.

मानधन बंद झालेल्या महिलांना पुन्हा लाभ मिळावा आणि पात्र महिलांना योजनेतून वगळले जाऊ नये, यासाठी संघटनेने प्रशासनाकडे तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.

## १२५ विद्यार्थ्यांचा गांधी विचार संस्कार परीक्षेत सक्रीय सहभाग



### एस.एस.जी.एम. महाविद्यालयात विचार संस्कार परीक्षा उत्साहात

**● कोपरगाव । वीरभूमी –**

गांधीजींचे जीवनकार्य, स्वातंत्र्यलढ्यातील योगदान आणि समाजपरिवर्तनाचा संदेश विद्यार्थ्यांना समजावा, तसेच त्यांच्यात सामाजिक बांधिलकी, बंधुभाव, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रप्रेमाची भावना विकसित व्हावी, यासाठी हा उपक्रम एस.एस.जी.एम. महाविद्यालयात गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगाव यांच्या वतीने गांधी विचार संस्कार परीक्षा घेण्यात आली. महात्मा गांधी यांचे सत्य, अहिंसा, शांती, स्वावलंबन आणि नैतिक मूल्यांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, हा परीक्षेचा उद्देश होता. या परीक्षेसाठी महाविद्यालयातील १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

विचार संस्कार परीक्षेमुळे विद्यार्थ्यांना गांधीजींच्या प्रेरणादायी प्रसंगांचा परिचय झाला असून सामाजिक व नैतिक मूल्यांची जाणीव दृढ होण्यास मदत झाली. प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी परीक्षास्थळी भेट देत परीक्षेसाठी परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

विचार संस्कार परीक्षेच्या यशस्वी आयोजनासाठी प्र.उपप्राचार्य रवींद्र हिंगे, पर्यवेक्षक श्री.माधव रेवगडे आणि परीक्षा समन्वयक श्री. ज्ञानेश्वर झांबरे यांसह शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलामांचा त्याग भारतीयांसाठी प्रेरणादायी : प्राचार्य संपत दसपुते

### चापडगाव विद्यालयात जयंती व वाचन प्रेरणा दिन उत्साहात

**● शेवगाव । वीरभूमी–**



डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे जीवन वैराग्य, त्याग आणि समर्पणाचे प्रतीक होते. त्यांनी आपले संपूर्ण जीवन देशासाठी समर्पित केले. आजच्या तरुणांचे विचार करण्याचे प्रमाण कमी होत असल्याने त्यांच्यातील मानसिक मरगळ वाढत आहे, असे प्रतिपादन चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य संपत दसपुते यांनी केले.

चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती आणि वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून प्राचार्य दसपुते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर उपमुख्याध्यापक सुनील जायभाये, पर्यवेक्षक संजय दुधाडे, प्रा. किरण गोरे, प्रा. दादासाहेब ज्योतिक, अशोक आघवणे, वत्सला जाधव, ज्ञानेश्वर आवारे, विद्यावर्धिनी मुळे, संजय मरकड आदी मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य दसपुते म्हणाले की, डॉ. अब्दुल कलाम यांची युवकांप्रती महान निष्ठा होती. त्यांनी वेळेला नेहमी महत्त्व दिले. त्यांच्या जीवनात असंख्य अडचणी आल्या; मात्र त्यांनी कधीही हार मानली नाही. जिद्द आणि चिकाटी हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील महत्त्वाचे गुण होते.

विद्यार्थ्यांनी केवळ एक दिवस वाचन प्रेरणा दिन साजरा न करता दररोज किमान अर्धा तास ग्रंथालयातील पुस्तकांचे वाचन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

शिक्षक प्रतिनिधी म्हणून मनोगत व्यक्त करताना प्रा. किरण गोरे म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्याला वाचनाची गोडी लागणे आवश्यक आहे. वाचनामुळे ज्ञानाची प्रगल्भता वाढते. भारत महासत्ता व्हावा, यासाठी अविरत स्वप्न पाहणारे अवलिया म्हणजे डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम होत.

तारुण्याला जिवंत ठेवायचे असेल, तर विद्यार्थ्यांनी महान व्यक्तींच्या विचारांसोबत चालले पाहिजे. शंभर मित्र बनविणे आणि एक चांगले पुस्तक वाचणे यामध्ये एक वेगळ्या प्रकारची समानता आढळते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी किमान एक तरी पुस्तक वाचावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमादरम्यान इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना एका धड्याचे वाचन करण्यास सांगण्यात आले. त्यानंतर शिक्षकांनी संबंधित धड्यावर विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रश्नांची उत्तरे दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सर्जेराव निकाळजे यांनी केले. गजानन दरंदले यांनी अनुमोदन दिले, तर प्रा. दादासाहेब ज्योतिक यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंदाचे सहकार्य लाभले.

# शेवगावच्या स्वच्छतेत आठ दिवसांत सुधारणा करा; अन्यथा कारवाई

### मुख्याधिकारी विजया घाडगे यांचा कर्मचाऱ्यांना इशारा । गैरहजर व दिरंगाई करणाऱ्यांना नोटिसा, दिवसातून तीन वेळा हजेरी

**● शेवगाव । वीरभूमी–**

शहरातील अस्वच्छतेचे चित्र बदलण्यासाठी शेवगाव नगरपरिषदेचा स्वच्छता विभाग अधिक कृतीशील करण्याच्या दृष्टीने प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. स्वच्छतेच्या कामात हलगर्जीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कामकाजात आठ दिवसांत सुधारणा न झाल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा मुख्याधिकारी विजया घाडगे यांनी दिला.

घंटागाडी वेळेवर येत नसल्यासह स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कामकाजाबाबत लोकप्रतिनिधींनी तक्रारी मांडल्यानंतर प्रशासनाने हा निर्णय घेतला. शहरातील स्वच्छता व आरोग्य व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी गुरुवारी (दि. १५) नगरपरिषद कार्यालयात बैठक घेण्यात आली. नगराध्यक्षा माया मुंढे, उपनगराध्यक्ष सिराजुद्दीन पटेल आणि मुख्याधिकारी विजया घाडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत शहरातील विविध प्रभागांमधील स्वच्छतेच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

शहरातील सर्व प्रभागांत नियमित झाडलोट करणे, प्रमुख रस्ते व चौकांची वेळेवर साफसफाई करणे तसेच ठिकठिकाणी कचरा साचणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना आरोग्य विभागाला देण्यात आल्या. घंटागाडीच्या माध्यमातून घनकचऱ्याचे नियमित संकलन करण्यावरही भर देण्यात आला. स्वच्छतेची कामे केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात प्रभावीपणे झाली पाहिजेत, अशी अपेक्षा बैठकीत व्यक्त करण्यात आली.

बैठकीत नगरसेवक व नगरसेविकांनी शहरातील स्वच्छता व्यवस्थेबाबत नाराजी व्यक्त केली. अनेक भागांत घंटागाडी वेळेवर येत नसल्याने कचरा साचत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. तसेच घंटागाडीसोबत असलेले कर्मचारी केवळ गाडीत बसून राहतात आणि नागरिकांना अपेक्षित सहकार्य करत नसल्याच्या तक्रारीही करण्यात आल्या. शहरातील स्वच्छतेचा प्रश्न गांभीर्याने घेऊन तातडीने सुधारणा करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली.

या तक्रारींची दखल घेत मुख्याधिकारी विजया घाडगे यांनी आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना कामकाजात सुधारणा करण्यासाठी आठ दिवसांची मुदत दिली. कर्तव्यावर गैरहजर राहणाऱ्या तसेच कामात दिरंगाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांना तातडीने नोटिसा बजावण्याचे आदेशही त्यांनी दिले. कर्मचाऱ्यांची दिवसातून तीन वेळा हजेरी घेण्यात येणार असून, विनाकारण गैरहजर राहणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, नगरपरिषद कर्मचाऱ्यांनीही बैठकीत आपल्या अडचणी मांडल्या. स्वच्छतेची कामे करताना आवश्यक असलेले झाडू, बांबू, घमेले, हातमोजे (हँड ग्लोव्हज)



तसेच गणवेश उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली. स्वच्छतेची कामे प्रभावीपणे पार पाडण्यासाठी कर्मचाऱ्यांना आवश्यक साधने व सुविधा मिळणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

याची दखल घेत मुख्याधिकारी विजया घाडगे यांच्यासह उपस्थित पदाधिकाऱ्यांनी आवश्यक साधनसामग्री व सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासनाला सूचना दिल्या. शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी पार पाडताना कर्मचाऱ्यांनाही आवश्यक साहित्य मिळाले पाहिजे, यावर बैठकीत भर देण्यात आला. आठ दिवसांच्या मुदतीत स्वच्छतेच्या कामात कितपत सुधारणा होते आणि प्रशासनाच्या सूचनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी होते, याकडे आता शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

बैठकीला नगरसेवक आशुतोष डहाळे, वजीर पठाण, निलेश रोकडे, कैलास तिजोरे, सागर फडके, संतोष जाधव, कमलेश गांधी, नंदू मुंढे, जाकीर कुरेशी, तसेच नगरसेविका आशा बुलबुले, डॉ. गीता लांडे, सुवर्णा मगरे, ज्योती लिंगे, तृषा भारस्कर, साधना लांडे यांच्यासह आरोग्य विभागाचे प्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## SPOT NEWS



### मढेवडगाव येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात

**● श्रीगोंदा | वीरभूमी –**

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, मढेवडगाव येथे वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ग्रंथप्रदर्शन, विद्यार्थ्यांची मनोगते आणि प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षक रामदास पवार होते. शंकर यदलोड यांनी ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन केले. प्रश्नमंजुषा स्पर्धेत अनुराधा गांगोडे, अथर्व शिंदे, इशिता जाधव, रिद्धिका कुमावत आणि विशाल मांडे यांनी यश मिळवले. तेजस्विनी गटणे हिने वाढदिवसानिमित्त अहिल्याबाई होळकर यांचे पुस्तक भेट देऊन वाचन संस्कृतीला प्रोत्साहन दिले. इयत्ता नववी 'अ'च्या विद्यार्थ्यांनी वर्गशिक्षिका लक्ष्मी बोलणे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन केले. मुख्याध्यापक हौसराव दांगडे, पर्यवेक्षक विलास सुलाखे आणि सांस्कृतिक विभागप्रमुख सुजाता डाके यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी मासाळ आणि मुस्कान पटेल यांनी केले. यावेळी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# पारनेर नगरपंचायतीचे ८५ स्ट्रीट लाईट पोल गायब!

## राजपथ ठेकेदाराविरुद्ध पोलिसांत तक्रार | नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे यांची सखोल चौकशी व कारवाईची मागणी

**● पारनेर | वीरभूमी–**

खडकी ते देवीभोयरे फाटा रस्त्याच्या कामादरम्यान पारनेर नगरपंचायतीच्या मालकीचे ८५ स्ट्रीट लाईट पोल आणि त्यांवरील हायमॅक्स दिवे पूर्वपरवानगी न घेता काढून नेण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी संबंधित रस्त्याचे काम करणाऱ्या राजपथ या ठेकेदाराविरुद्ध तक्रार दाखल करून कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी पारनेर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा डॉ. विद्या बाळासाहेब कावरे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पारनेर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहे.



निवेदनानुसार, खडकी ते देवीभोयरे फाटा रस्त्याचे काम सुरू असताना नगरपंचायतीच्या मालकीचे एकूण ८५ स्ट्रीट लाईट पोल आणि त्यांवर बसविण्यात आलेले हायमॅक्स दिवे काढून नेण्यात आले. हे साहित्य काढण्यासाठी नगरपंचायतीची पूर्वपरवानगी घेण्यात आली नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

हे पोल आणि दिवे सार्वजनिक निधीतून उभारलेली नगरपंचायतीची मालमत्ता आहे. त्यामुळे ते काढताना आवश्यक परवानगी घेणे, साहित्याची नोंद ठेवणे, ते सुरक्षित ठिकाणी जमा करणे आणि नगरपंचायतीला अधिकृत माहिती देणे अपेक्षित होते. मात्र, काढून नेलेल्या साहित्याचा सध्याचा ठावठिकाणा नगरपंचायतीला माहीत नसल्याने मालमत्तेच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

संबंधित ठेकेदाराला पोल आणि दिवे काढण्याचे आदेश कोणी दिले, त्यासाठी कोणती परवानगी घेण्यात आली होती आणि काढून नेलेले साहित्य सध्या कुठे व कोणाच्या ताब्यात आहे, याची चौकशी करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या प्रकरणात अन्य व्यक्तींचा सहभाग आहे का, याचाही तपास करण्याची विनंती करण्यात आली आहे.

पोलिसांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन संबंधित ठेकेदारासह जबाबदार व्यक्तींची चौकशी करावी, सर्व ८५ पोल आणि हायमॅक्स दिव्यांचा शोध घ्यावा तसेच संबंधित कागदपत्रांची तपासणी करावी, अशी मागणी नगराध्यक्षा डॉ. कावरे यांनी केली आहे. चौकशीत मालमत्तेचे नुकसान, अपहार किंवा अन्य कोणताही गुन्हा निष्पन्न झाल्यास संबंधितांविरुद्ध लागू कायद्यानुसार कारवाई करावी, असेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

दरम्यान, या प्रकरणातील आरोपांची सत्यता, साहित्य काढण्यामागील कारण आणि त्याची सद्यस्थिती पोलीस तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

# वाचनातूनच व्यक्तिमत्त्व घडते; पुस्तकांशी मैत्री करा : नगराध्यक्ष पराग संधान

### कोपरगाव पालिकेच्या वतीने वाचन प्रेरणा दिन साजरा

**● कोपरगाव | वीरभूमी –**

वाचन हे केवळ ज्ञान मिळविण्याचे साधन नसून व्यक्तिमत्त्व विकासाचा पाया आहे. पुस्तकांच्या वाचनातून विचारांना दिशा मिळते, ज्ञानाची व्याप्ती वाढते आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन समृद्ध होतो. आजच्या डिजिटल युगातही पुस्तकांचे महत्त्व कायम आहे. विद्यार्थ्यांसह प्रत्येकाने नियमित वाचनाची सवय जोपासावी. वाचन संस्कृती रुजविण्यासाठी कोपरगाव नगरपरिषदेच्या माध्यमातून 'पुस्तक पेटी वाचन उपक्रम' राबविण्यात येत आहे. या उपक्रमातून अधिकाधिक नागरिकांपर्यंत पुस्तकांचे महत्त्व पोहोचावे आणि वाचनाची आवड निर्माण व्हावी,असे प्रतिपादन कोपरगावचे नगराध्यक्ष पराग संधान यांनी केले.



कोपरगाव नगरपरिषद संचालित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक ग्रंथालयाच्या वतीने १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिनानिमित्त 'पुस्तक पेटी वाचन उपक्रम' राबविण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष पराग संधान विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते.'चला वाचूया, स्वतः ला घडवूया' हा संदेश देत वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणे आणि नागरिकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

भारताचे माजी राष्ट्रपती आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिन साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून सार्वजनिक ग्रंथालयाच्या माध्यमातून पुस्तकांचे महत्त्व अधोरेखित करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण होण्याबरोबरच त्यांच्यात ज्ञानार्जनाची आवड वाढावी आणि वाचन संस्कृतीचा प्रसार व्हावा, यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

याप्रसंगी कोपरगाव नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पराग संधान यांच्यासह सर्व पदाधिकारी व अधिकाऱ्यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन केले.या उपक्रमाचे नियोजन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजित निकित,नगराध्यक्ष पराग संधान आणि शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक समितीच्या सभापती संजना उदावंत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. नगरपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य आणि कर्मचारीवृंद या उपक्रमात सहभागी आहेत.

### हरदिन मॉर्निंग ग्रुपतर्फे भिंगारमध्ये धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात

**● अहिल्यानगर | वीरभूमी –**

भगवान बुद्धांचा समता, स्वातंत्र्य, बंधुता व मैत्रीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने भिंगार येथील हरदिन मॉर्निंग ग्रुपतर्फे धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. बुधवारी (दि. १४) भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क येथे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमात भगवान बुद्धांच्या पूर्णाकृती पुतळ्यावर पुष्पवृष्टी व मेणबत्ती प्रज्वलित करून अभिवादन करण्यात आले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माचा स्वीकार केल्याच्या ऐतिहासिक घटनेला उजाळा देत बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले. धम्ममित्र संजय भिंगारदिवे व विकास भिंगारदिवे यांच्या मार्गदर्शनाखाली त्रिशरण व पंचशील घेण्यात आले. यावेळी बुद्धवंदना, स्वच्छता अभियान आणि वृक्षारोपण करण्यात आले. बुद्धांच्या करुणा, प्रज्ञा व मैत्रीच्या विचारांसह डॉ. आंबेडकरांच्या समता, स्वाभिमान व सामाजिक न्यायाच्या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्प उपस्थितांनी केला.

## शेवगावात २७ ऑक्टोबर व १५ डिसेंबरला महसूल लोकअदालतचे आयोजन; प्रलंबित दावे निकाली निघणार

**● शेवगाव | वीरभूमी–**

महसूल प्रशासनातील न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेले महसुली दावे व अपिले पक्षकारांच्या परस्पर सामंजस्याने जलदगतीने निकाली काढण्यासाठी राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या वतीने 'महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोकअदालत अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत शेवगाव तहसील कार्यालयात २७ ऑक्टोबर आणि १५ डिसेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महसूल लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार आकाश दहाडदे यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या १३ ऑगस्ट २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अपील शाखेच्या २९ सप्टेंबर २०२६ रोजीच्या परिपत्रकानुसार हे अभियान राबविण्यात येत आहे. १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत अभियान राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

या अभियानात महसूल प्रशासनातील अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या विविध प्रकारच्या महसुली दावे व अपिलांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये कुळकायद्याशी संबंधित दावे, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम १४३ अन्वये रस्ता व वहिवाटीच्या दाव्यांशी संबंधित प्रकरणे, मामलतदार न्यायालय अधिनियम १९०६ मधील कलम ५(२) अन्वये दाखल प्रकरणे, वारस नोंदींचे वाद, अधिकार अभिलेखासंबंधी प्रकरणे, ज्येष्ठ नागरिकांच्या निर्वाह व कल्याण अधिनियमांतर्गत प्रकरणे तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ८५ अन्वये वाटपाची प्रकरणे आदींचा समावेश आहे.

या माध्यमातून प्रलंबित प्रकरणे पक्षकारांच्या परस्पर संमतीने तडजोडीद्वारे निकाली काढण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यामुळे संबंधित नागरिकांचा वेळ व खर्च वाचण्यास मदत होणार असून, महसूल न्यायालयांवरील प्रलंबित प्रकरणांचा भार कमी होण्यासही हातभार लागणार आहे.

लोकअदालतीत सहभागी होण्यासाठी संबंधित अर्धन्यायिक न्यायालयात किंवा कार्यालयात महसुली दावा अथवा अपील प्रलंबित असलेल्या दोन्ही पक्षकारांनी किंवा त्यांच्या वकिलांमार्फत विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. प्राप्त अर्जांची छाननी केल्यानंतर दोन्ही पक्षकारांची तडजोडीसंदर्भातील संमती असल्याची खात्री करण्यात येईल. संमती झाल्यानंतर नियमानुसार तडजोडनामा प्राप्त करून घेण्यात येणार आहे.

तडजोडनामा प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्ये लोकअदालतीच्या दिवशी दोन्ही पक्षकारांच्या सहमतीने संबंधित प्रलंबित दाव्यांवर अंतिम आदेश पारित करून प्रकरणे कायमस्वरूपी निकाली काढण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

शेवगाव तालुक्यातील महसुली प्रकरणे प्रलंबित असलेल्या नागरिकांनी या अभियानाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी संबंधित गावचे ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी किंवा तहसील कार्यालय, शेवगाव येथील कुळकायदा शाखेशी संपर्क साधावा, असे आवाहन तहसील कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

# बाबुजी आव्हाड महाविद्यालयात सलग चार तास वाचन!

## वाचनाची आवड जोपासण्यासाठी ग्रंथालय विभागाचा उपक्रम | ४९ विद्यार्थ्यांचा सहभाग, पुस्तक परीक्षणही केले

**● पाथर्डी | वीरभूमी–**

भारताचे माजी राष्ट्रपती व भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांसाठी सलग चार तास वाचन उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात महाविद्यालयातील ४९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून वाचलेल्या पुस्तकांचे परीक्षण केले.

दूरदर्शन, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे तरुण पिढीची वाचनाची आवड कमी होत असल्याची चिंता व्यक्त केली जाते. यूट्यूब, फेसबुक, व्हॉट्सप, इन्स्टाग्राम, एक्स यांसारख्या समाजमाध्यमांच्या आकर्षणातून विद्यार्थ्यांनी पुन्हा पुस्तकांकडे वळावे, तसेच वाचन प्रेरणा दिनापुरते मर्यादित न राहता वर्षभर वाचनाची सवय जोपासावी, हा या उपक्रमामागील उद्देश होता.

पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड यांच्या संकल्पनेतून आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. चार तासांच्या वाचन कालावधीत विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर करू नये, याची दक्षता घेण्यात आली. पुस्तक परीक्षणात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे 'माझे जीवन' हे पुस्तक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. बबन चौरे म्हणाले, वाचन ही श्वासोच्छ्वासाइतकीच आवश्यक बाब आहे. परीक्षा आणि अभ्यासक्रमाच्या पलीकडे व्यक्तिमत्त्व विकासाचे माध्यम म्हणूनही आपण वाचले पाहिजे. केवळ अभ्यासक्रमातील यश म्हणजे ज्ञान नव्हे; वाचनातून मिळणारा आनंद आणि त्यातून होणारी सर्वांगीण समृद्धी माणसाचे जीवन समृद्ध करते.



वाचन हे ज्ञानार्जनाचे साधन असून जीवनभर उपयोगी पडणारी शिदोरी आहे, असे सांगून त्यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला. प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन त्यांनी स्वतःला घडविले. देशाच्या संरक्षण आणि अवकाश क्षेत्रातील त्यांचे योगदान सदैव स्मरणात राहील. अभ्यास आणि दर्जेदार वाचनाच्या बळावर राष्ट्रपतीपदापर्यंत पोहोचलेल्या डॉ. कलाम यांचे जीवन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे, असेही त्यांनी नमूद केले.

डॉ. कलाम यांचे विचार सांगताना ते म्हणाले की, चांगले पुस्तक हे शंभर मित्रांसारखे असते. विद्यार्थ्यांनी दर्जेदार पुस्तके वाचून वाचनाची आवड निरंतर जोपासावी. हाच डॉ. कलाम यांना खरा अभिवादनाचा मार्ग ठरेल.

या उपक्रमाचे आयोजन ग्रंथपाल डॉ. किरण गुलदगड, प्रा. सचिन पालवे आणि प्रा. मन्सूर शेख यांनी केले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

## पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीतील

# कॉंक्रिटीकरणाच्या कामावर शंकर नगरे यांचे आक्षेप

**मंजूर जागेऐवजी दुसरीकडे काम केल्याचा आरोप । कामाची गुणवत्ता तपासून सखोल चौकशी करण्याची मागणी**

**● पारनेर । वीरभूमी –**
कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात सुरू असलेल्या रस्ता कॉंक्रिटीकरणाच्या कामावर समितीचे संचालक शंकर नगरे यांनी आक्षेप घेतला आहे. मंजूर ठिकाणी काम न करता दुसऱ्या ठिकाणी कॉंक्रिटीकरण केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच, दुष्काळी परिस्थितीत पाण्याची उपलब्धता नसताना कामाची घाई केली जात असल्याने बांधकामाच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

नगरे यांच्या म्हणण्यानुसार, बाजार समितीतील कॉंक्रिटीकरणाच्या दोन कामांसाठी अनुक्रमे ८ लाख ७१ हजार ५०० रुपये आणि ५ लाख ३४ हजार ८०० रुपये, अशी एकूण १४ लाख ६ हजार ३०० रुपयांची अंदाजित रक्कम आहे. काट्याच्या उत्तर बाजूला रस्ता कॉंक्रिटीकरणाचे काम मंजूर असताना, यापूर्वी केलेले आणि चांगल्या स्थितीत असलेले कॉंक्रिटीकरण कॉंक्रिट ब्रेकरच्या साहाय्याने फोडून त्याच ठिकाणी पुन्हा कॉंक्रिटीकरण केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

दोन दिवसांपूर्वी संबंधित जागा उकरल्यानंतर लगेच कागद टाकण्यात आला आणि त्यानंतर कॉंक्रिटीकरण सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले, असे नगरे यांनी सांगितले. कामाची पाहणी करण्यासाठी ते सकाळी बाजार समितीत गेले असता सभापती, उपसभापती आणि संचालक मंडळ उपस्थित होते. यावेळी त्यांनी कामाच्या पद्धतीबाबत विचारणा केली. कॉंक्रिटीकरणापूर्वी पाणी मारणे, रोलिंग करणे आणि बांधकामासाठी आवश्यक असलेल्या प्रक्रियांचे पालन याबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केले.

राज्यात दुष्काळाची गंभीर परिस्थिती असताना बांधकामासाठी पुरेसे पाणी उपलब्ध होणार का, असा सवाल नगरे यांनी उपस्थित केला. शेतकरी पाणीटंचाईने त्रस्त असून, जनावरांसाठी पिण्याचे पाणी आणि चारा उपलब्ध करणेही कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत बांधकामाच्या गुणवत्तेसाठी आवश्यक पाणी कुठून आणले जाणार, असा प्रश्न त्यांनी केला. पाण्याअभावी कामाचा दर्जा खालावण्याची शक्यता असल्याने शासनाने अशा परिस्थितीत सुरू असलेल्या कामांचा आढावा घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

या प्रकरणी जिल्हा उपनिबंधकांची भेट घेतल्यानंतर पारनेर येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेण्यास सांगण्यात आल्याचे नगरे यांनी नमूद केले. त्यानंतर संबंधित कार्यालयाकडून चौकशीसाठी एका महिला अधिकाऱ्याला पाठवण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. या चौकशीत काय निष्पन्न होते, याकडे लक्ष लागले आहे. अंदाजपत्रकात पाणी मारण्याच्या कामाचा समावेश नसल्याचे ठेकेदाराचे म्हणणे असल्याचाही दावा नगरे यांनी केला.



बाजार समितीतील कामे मंजूर ठिकाणीच आणि निर्धारित दर्जानुसार व्हावीत. कामात अनियमितता आढळल्यास सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नगरे यांनी केली. तसेच, दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांच्या गरजांना प्राधान्य देत बाजार समितीने चारा छावण्या सुरू करण्यासाठी आणि पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

दरम्यान, या आरोपांबाबत बाजार समितीचे पदाधिकारी आणि संबंधित ठेकेदार यांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे चौकशीचे निष्कर्ष आणि संबंधितांची बाजू महत्त्वाची ठरणार आहे.

# कालवा सल्लागार समितीची बैठक तातडीने घ्या

**आ. आशुतोष काळेंचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटलांना साकडे**

**● कोपरगाव । वीरभूमी–**
चालू वर्षी राज्यासह कोपरगाव मतदारसंघात अपेक्षित पाऊस न झाल्यामुळे पर्जन्यमानात मोठी घट झाली असून संपूर्ण परिसराला दुष्काळाच्या झळा सोसाव्या लागत आहेत.परंतु धरणक्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्यामुळे सर्व धरणे भरलेली आहेत हि काहीशी दिलासादायक बाब आहे. त्यामुळे जरी खरीप हंगाम पूर्णपणे शेतकऱ्यांच्या हातातून गेला असला तरी गोदावरी कालव्याच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामाच्या चिंता सतावत आहेत. गंभीर दुष्काळी परिस्थिती पाहता गोदावरी कालव्यातून किती आवर्तन, कधी मिळणार याची माहिती लाभधारक शेतकऱ्यांना वेळेत मिळावी यासाठी कालवा सल्लागार समितीची तातडीने बैठक घ्यावी असे साकडे आ.आशुतोष काळे यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पा.यांना दिलेल्या निवेदनात घातले आहे.



> जलसंपदा विभागाकडून १५ऑक्टोबरला धरणांमध्ये उपलब्ध असलेल्या एकूण उपयुक्त जलसाठ्याची अंतिम आकडेवारी निश्चित केली जाते. याच साठ्याच्या आधारे पुढील वर्षाच्या पावसाळ्यापर्यंत पाण्याच्या वापराचे काटेकोर नियोजन केले जाते. धरणात उपलब्ध असणारा पाणी साठा आणि त्याचे नियोजन सर्व घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कालवा सल्लागार समितीची बैठक महत्वाचे माध्यम आहे. कालवा सल्लागार समितीच्या बैठकीमुळे लाभधारक शेतकऱ्यांना सिंचनासाठी उपलब्ध होणाऱ्या पाण्याची नेमकी माहिती मिळणार असून त्यानुसार शेतकरी आपल्या शेतात कोणती पिके घ्यावीत याचे योग्य नियोजन करू शकणार आहे. त्यामुळे कालवा सल्लागार समितीची बैठक तातडीने घेणे गरजेचे आहे.
>
> **– आमदार आशुतोष काळे**

दिलेल्या निवेदनात आमदार आशुतोष काळे यांनी पुढे असे म्हटले आहे की,एल निनोच्या प्रभावामुळे राज्यासह संपूर्ण कोपरगाव मतदार संघात गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे जरी धरणे भरलेली असले तरी शिल्लक पाणी पुढील वर्षी पाऊस सुरु होईपर्यंत पुरवण्याचे मोठ आव्हान आहे. अशा परिस्थितीत वाढत असलेली उष्णता त्यामुळे मोठ्या प्रमाणात होणारे बाष्पीभवन पाहता धरणात किती पाणी शिल्लक राहील याचा अंदाज बांधणे कठीण आहे. त्यामुळे गोदावरी कालव्यातून सिंचनासाठी किती आवर्तन कधी मिळणार याकडे लाभधारक शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

आर्थिक अडचणी असतांनाही शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पिके उभी केली होती परंतु पुन्हा एकदा लहरी हवामानाचे बळी शेतकरी ठरले आहेत. त्यामुळे खरीप हंगाम जरी हातातून गेला तरी रब्बी हंगामातून काही तरी पदरात पडेल अशी शेतकऱ्यांना अपेक्षा आहे. त्यासाठी त्यांना गोदावरी कालव्याच्या आवर्तनाचे नियोजन कसे असेल याची अचूक माहिती होणे आवश्यक आहे. जेणेकरून उपलब्ध पाण्याचा विचार करून त्यांना पिकांची निवड करता येणे शक्य होणार आहे. त्यासाठी तातडीने कालवा सल्लागार समितीची बैठक घेणेबाबत जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचित करावे असे आमदार आशुतोष काळे यांनी दिलेल्या निवेदनात शेवटी म्हटले आहे.

# साधी राहणी, उच्च विचार आणि ज्ञानसाधनेतून तरुणांसाठी प्रेरणास्थान : पंजाबराव आहेर

**आयुर्वेद कॉलेजमध्ये डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती व वाचन प्रेरणा दिन**



**● शेवगाव । वीरभूमी–**
डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी आपल्या वैज्ञानिक संशोधनातून भारताच्या संरक्षण व अंतराळ क्षेत्राच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिले. साधी राहणी, उच्च विचारसरणी, प्रचंड मेहनत आणि विद्यार्थ्यांप्रती असलेले प्रेम यामुळे ते देशातील तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरले, असे प्रतिपादन आयुर्वेद कॉलेजचे कार्यकारी संचालक पंजाबराव आहेर यांनी केले.

शेवगाव येथील आयुर्वेद कॉलेजमध्ये भारताचे माजी राष्ट्रपती व थोर शास्त्रज्ञ डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांची ९५ वी जयंती आणि वाचन प्रेरणा दिन कार्यकारी संचालक पंजाबराव आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. संतोष पवळे, उपप्राचार्य डॉ. उमेश शिरसाट, डॉ. संजय लुंगारे, डॉ. श्रीकांत दारोकर, डॉ. रेणुका सूर्यवंशी, डॉ. अंकुश खेडकर, डॉ. राधा करपे, डॉ. सुवर्णा सानप आदी प्रमुख उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डॉ. संतोष पवळे यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनशैलीचा उल्लेख करत त्यांच्या साधेपणा, शिस्त, जिद्द आणि ज्ञानसाधनेवर प्रकाश टाकला. प्रतिकूल परिस्थितीतही कठोर परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या बळावर मोठे यश संपादन करता येते, हा संदेश डॉ. कलाम यांच्या जीवनातून मिळतो, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी वाचनाची सवय लावून विविध विषयांतील पुस्तके वाचावीत, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय देशमुख यांनी केले. राहुल मुथा यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. राहुल फुदे यांनी आभार मानले.

# अकोले बाजार समितीत आता भुसार शेतमालाचेही लिलाव

**शेतमाल विक्रीतील फसवणूक टाळण्यासाठी बाजार समितीचा निर्णय**

**● अकोले । वीरभूमी–**
कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अकोले, कोतूळ आणि समशेरपूर येथील बाजार आवारांत भाजीपाल्याचे लिलाव पद्धतीने विक्री व्यवहार यशस्वी होत आहेत. अकोले तालुक्यासह संगमनेर आणि सिन्नर तालुक्यांतील शेतकऱ्यांनीही या उपक्रमाला चांगला प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे तिन्ही बाजार आवारांतील शेतकरी आणि व्यापारी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.



भाजीपाला लिलावाच्या धर्तीवर सोयाबीन, मका, भात, बाजरी, गहू, हरभरा आदी भुसार शेतमालाचेही लिलाव सुरू करावेत, अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत होती. त्यानुसार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत भाजीपाल्याप्रमाणेच भुसार शेतमालाचे लिलाव सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

काही परवानाधारक नसलेले व्यापारी थेट शेतकऱ्यांच्याबांधावर जाऊन शेतमालाची खरेदी करतात. यासाठी अनधिकृत वजनकाट्यांचा वापर केला जात असल्याच्या तक्रारी आहेत. तसेच काही व्यापारी शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करून मोठ्या प्रमाणात शेतमाल खरेदी करतात; मात्र त्यानंतर देय रक्कम थकवली जाते. अशा प्रकारच्या तक्रारी बाजार समितीकडे येत असतात.

शेतकऱ्यांची अशा प्रकारे होणारी फसवणूक टाळण्यासाठी भुसार शेतमालाची विक्रीही बाजार समितीच्या आवारात लिलाव पद्धतीने करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाला तालुक्यातील सर्व अधिकृत व्यापारी सकारात्मक प्रतिसाद देतील, अशी अपेक्षा बाजार समितीने व्यक्त केली आहे.

सर्व शेतकरी बांधवांनी आपला भुसार शेतमाल विक्रीसाठी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अकोले बाजार आवारात आणावा, असे आवाहन बाजार समितीचे सभापती भानुदास पाटील तिकांडे, उपसभापती रोहिदास पाटील भोर, सचिव राजेंद्र जगताप आणि सर्व संचालक मंडळाने केले आहे.

# कुकडीच्या पाण्याचे नियोजन तातडीने जाहीर करा!

**हरभरा, गहू, कांद्यासाठी तीन रोटेशनची मागणी; दूध उत्पादकांसाठी मार्च-एप्रिलमध्येही पाणी द्या : लामखडे**

**● निघोज । वीरभूमी–**
राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि पाण्यावर असलेले कडक निर्बंध लक्षात घेता, कुकडी डावा कालवा व कुकडी नदीच्या पाण्याचे नियोजन तातडीने जाहीर करावे, अशी मागणी निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत लामखडे यांनी केली आहे. नारायणगाव येथील पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन पाठवून त्यांनी पाणी सोडण्याचे वेळापत्रक, रोटेशनचा कालावधी आणि प्रत्येक तालुक्याला मिळणाऱ्या पाण्याची माहिती जाहीर करण्याची मागणी केली आहे.

लामखडे यांनी निवेदनात म्हटले आहे की, शेतकऱ्यांनी आगामी हंगामातील पिकांचे नियोजन केले आहे. मात्र, दुष्काळी परिस्थितीमुळे कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्राधान्य देण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. अशा परिस्थितीत नारायणगाव विभागाच्या पाटबंधारे अधिकाऱ्यांनी यंदा पाणी कधी सोडले जाणार, प्रत्येक रोटेशन किती दिवसांचे असेल आणि कोणत्या तालुक्याला किती दिवस पाणी मिळणार, याचे वेळापत्रक जाहीर करणे आवश्यक आहे.



यासाठी शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सल्लागार मंडळाची बैठक घेऊन पाण्याच्या नियोजनाबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

पारनेर तालुक्यातील कुकडी प्रकल्पाचे लाभधारक शेतकरी प्रामुख्याने हरभरा, गहू आणि कांदा ही पिके घेतात. या पिकांना आवश्यक पाणी मिळण्यासाठी तीन रोटेशन मिळणे गरजेचे असल्याचे लामखडे यांनी नमूद केले आहे. त्यानुसार पहिले रोटेशन नोव्हेंबरमध्ये, दुसरे डिसेंबरमध्ये आणि तिसरे जानेवारी किंवा फेब्रुवारीमध्ये मिळावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

पाणीवापर संस्थांना पाण्याची गरज भासल्यानंतर त्या सामूहिकरीत्या नारायणगाव येथील पाटबंधारे अधिकाऱ्यांशी संपर्क साधून पाण्याची मागणी करतात. त्यामुळे पाणीवापर संस्थांच्या गरजा आणि शेतकऱ्यांचे पीक नियोजन विचारात घेऊन पाण्याचे वेळापत्रक निश्चित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

पारनेर तालुक्यात दूध उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. जनावरांसाठी हिरवा चारा उपलब्ध व्हावा, यासाठी घास, मका आणि कडवळ यांसारखी चारा पिके घेणे आवश्यक आहे. त्यासाठी मार्च किंवा एप्रिल महिन्यात आठ दिवसांचे पाणी रोटेशन द्यावे, अशी मागणी लामखडे यांनी केली आहे.

पावसाअभावी सोयाबीन, कापूस आणि बाजरी या पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी आधीच आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यातच कांदा पीक घ्यायचे असल्यास महागडे बियाणे खरेदी करणे, रोपे तयार करणे, जमिनीची मशागत आणि लागवड यासाठी हेक्टरी लाखो रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. अशा परिस्थितीत कांद्यासह अन्य पिकांसाठी आवश्यक असलेली तीन पाणी रोटेशन मिळाली नाहीत, तर शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान वाढून त्यांच्यावरील कर्जाचा बोजा अधिक वाढू शकतो, अशी चिंता लामखडे यांनी व्यक्त केली.

पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाणीवापर संस्था आणि शेतकऱ्यांची भूमिका शासनापर्यंत पोहोचवावी. उपलब्ध पाण्याचे नियोजन करून किती रोटेशन मिळणार, प्रत्येक रोटेशन किती दिवसांचे असेल आणि कोणत्या तालुक्याला किती दिवस पाणी दिले जाणार, याचे वेळापत्रक लवकरात लवकर जाहीर करावे, असे आवाहन चंद्रकांत लामखडे यांनी निवेदनाद्वारे केले आहे.